# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ



**नवी दिल्ली** : राज्यातील आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारख्या कारणांमुळे राज्य निवडणूक आयोगाने ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सोमवारी (दि. १२) सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यामुळे निवडणूक आयोगाला दिलासा मिळाला आहे, तर उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुकांच्या संदर्भात २१ फेब्रुवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्या वेळी पुढील निर्णय होईल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७७
www.ramprahar.com

◆ मंगळवार, १३ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



## अंतरंग


विमानतळाला लवकरच 'दिबां'चे नाव दिले जाणार/३

महायुतीच्या उमेदवारांची प्रचारात मोठी आघाडी/६

राष्ट्रीय कुमार कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर/८





# गेल प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देणार : खासदार तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यतील गेल प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसदर्भात १५ जानेवारी रोजी दिल्ली येथे गेलच्या कार्यकारी संचालकांसोबत बैठक लावण्यात आली आहे. पेट्रालीयम अॅन्ड नॅचरल गॅस स्टँडींग कमीटीच्या बैठकीत देखील यावर चर्चा केली जाईल. त्याचा अहवाल भारत सकारला पाठविण्यात येईल. गेल प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून दण्याचा माझा प्रयत्न आहे, असे खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले.



अलिबाग, मुरूड, रोहा तालुक्यातील समस्यांचा आढाव घेण्यसाठी खासदार सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि.१२) बैठक घेण्यात आली. या बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार नेहा भोसले, रायगड पोलीस अधीक्षक अँचल दलाल उपस्थित होत्या. या आढवा बैठकीनंतर खासदार सुनिल तटकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

या आढवा बैठकीस गेलचे कनिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे निर्णय घेता आले नाहित. गेलप्रकल्पग्रस्तांचेच्या प्रश्नांबाबत १५ जानेवारी रोजी दिल्लीत गेल कार्यकारी संचालकांशी चर्चा करण्यात येणार आहे. संसदेची पेट्रालीयम अॅन्ड नॅचरल गॅस स्टँडींग कमीटी आहे ज्याचा मी स्वतः अध्यक्ष आहे. ३१ खासदार सदस्य आहेत. या कमिटीच्या बैठकीत देखील रायगड येथील गेल प्रकल्पग्रस्ताच्या प्रश्नांबात चर्चा करण्यात येईल. त्याचा अहवाल केंद्र सरकारला पाठविण्यात येईल, असे खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले.

अदानी समुहातर्फे आगदंडा ते रोहा रेल्वमार्ग टाकण्यात येणार आहे. त्याच्या भूसंदानाची रक्कम निश्चीत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने आपला अहवाल उच्चाधिकार समितीकड पाठवला आहे. या समितीची बैठक उद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होते. या समितीची बैठक लवकर व्हावी यासाठी मी प्रयन्त करत आहे, असे खासदार तटकरे यांनी सांगितले.

अलिबाग तालुक्यातील शहापूर येथे पूर्वी टाटा वीज प्रकल्प येणार होता. त्यावेळी टाटाने शेतकर्यांना एक पॅकेज दिले होते. आता येथे सिनारमस प्रकल्प येत आहे. पूर्वी टाटाने पॅकेज दिले होते त्यात सिनारमस कंपनीने सुधारणा करून नवीन पॅकेज द्यावे अशी येथील प्रकल्पग्रस्त शेतकर्यांची मागणी आहे. शहापूर येथील शेतकर्यांना नवीन पॅकेज मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. मुरूड तालुक्यातील उसरोली, राजपूरी येथील १०० वर्षापूर्वीची गावठाणे गुरचणमध्ये आहेत.ती नियमित करण्याबात सुचना दण्यात आल्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले.

**जिल्हा परिषद निवडणूकीसाठी भाजपाशी युती**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तयारी केली आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांची युती होण्याबात चर्चा सुरू आहे. लवकरच याबात अंतिम निर्णय घण्यात येईल ,असे खासदार सुनिल तटकरे यांनी यांवी यावेळी स्पष्ट केले.

# देवीची नवसपूर्ती की अघोरी विद्या?

## नेरळ तलाव परिसरात संशयास्पद पूजा साहित्य

**नेरळ : प्रतिनिधी**

देवीला नवस फेडला की इच्छापूर्ती होते, या श्रद्धेच्या आड अघोरी विद्येचा प्रकार तर नाही ना, अशी शंका निर्माण करणारी घटना नेरळ शहरात घडली असून, यामुळे सकाळपासूनच शहरात चर्चांना उधाण आले आहे. नेरळ ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या राजमाता जिजाऊ भोसले तलाव परिसरात, देवी वाराही / देवी वार्ताळी समोरील चौथऱ्यावर आढळून आलेल्या संशयास्पद पूजासाहित्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.





नेहमीप्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी तलाव परिसरात आलेल्या जेष्ठ नागरिक व तरुणांना देवीच्या चौथऱ्याभोवती लाल कापडाचे पंधरा तुकडे, प्रत्येक तुकड्यावर नारळ, लिंबू, सुपारी आणि पानांचा विडा ठेवलेला दिसून आला. यासोबतच सिन्दूर लावलेल्या दगडांच्या ठिकाणीही नारळ व इतर साहित्य ठेवून पूजा केल्याचे स्पष्ट दिसत होते.

हा प्रकार रात्रीच्या अंधारात करण्यात आल्याचे लक्षात येताच नागरिकांमध्ये संभ्रम आणि भीती निर्माण झाली.

सामान्यतः देवीला नवस फेडताना नारळ, साडी–चोळी किंवा कापड अर्पण केले जाते, मात्र येथे अभिर–गुलालाऐवजी लाल कापड, लिंबू आणि ठराविक संख्येने ठेवलेले नारळ पाहून हा केवळ नवसपूर्तीचा प्रकार नसून, अघोरी विद्या किंवा अंधश्रद्धेचा प्रकार तर नाही ना, अशी चर्चा रंगू लागली आहे. प्रथमच असा प्रकार या परिसरात घडल्याने स्थानिक नागरिक अधिकच अस्वस्थ झाले आहेत.

राजमाता जिजाऊ भोसले तलाव हा परिसर नेहमीच गजबजलेला तसेच नागरिकांच्या नियमित सकाळी फिरण्यासाठी, ओपन जिमसाठी आणि शांततेसाठी ओळखला जातो, मात्र अशा प्रकारच्या संशयास्पद पूजाविधींमुळे नागरिकांमध्ये भीती, गैरसमज आणि अंधश्रद्धेला खतपाणी मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

एकूणच, देवीची नवसपूर्ती की अघोरी विद्या, हा प्रश्न अनुत्तरितच राहिला असून, अंधश्रद्धा की श्रद्धा यावरील वादाने नेरळकरांची सकाळ एका नव्या आणि अस्वस्थ करणाऱ्या चर्चेने सुरू झाली आहे. प्रशासन व संबंधित यंत्रणांनी या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन अशा घटनांना आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल वाळणच्या माजी विद्यार्थ्यांचे सुरत येथे स्नेहसंमेलन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शाळेचे आपल्या आयुष्यातील स्थान अनन्य साधारण आहे. शालेय जीवनातील आठवणी कायमस्वरुपी स्मरणात राहतात. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी तब्बल ३५ वर्षांनंतर वयाची ५० शी ओलांडलेले सन–१९८८–८९ इयत्ता १० च्या बॅच मधील विद्यार्थींनी वयाच्या वयोमर्यादेचे आकस न बाळगता एकत्र येवून पुन्हा आपले बालपण आठवण्यासाठी सर्व शाळकरी मित्रांनी तिसरे स्नेहसंमेलन सुरत येथे रविवार दि.११ जानेवारी रोजी मोठया उत्साहात साजरे केले.



या स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी अॅड.कैलास पवार, रविंद्र कालगुडे, दीपक पवार, विक्रम उतेकर,.प्रशांत कालगुडे, चंद्रप्रकाश ओमले. गंगाराम गोडावळे,.सखाराम मोरे,प्रकाश जावध, शांताराम कालगुडे, .मधुकर मोरे,.विठ्ठल बेंदुगडे, विनायक पवार, श्री.संतोष धनावडे,'राजेश मोरे, गुलाब उत्तेकर, भारती कालगुडे, .संदिप कालगुडे, शिवराम उत्तेकर, .सुरेश शिंदे, आनंद कडू, .शांताराम शिंदे,राजू जगताप,.दिनेश शेडगे किशोर गमरे आदि उपस्थित होते.

# इनरव्हील क्लब, ब्राम्हणसभा यांच्या संयुक्त विद्यमाने ओवीरंग कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती व परंपरा जपण्यासाठी ओवी रंग या माध्यमातून समाजातील नवीन पिढीला ५० वर्षा पूर्वी भारतातील खेड्या पाड्यातील घरामधील ज्या महिला वर्ग होत्या त्या आपल्या घरातील दळण जात्यावर दळत असताना ओव्या म्हणत आपली कामे करत असत ,पाट्यावर वाटण वाटणे, उखळीतून भात सडून त्यापासून तांदूळ बनवणे या प्रकाराची कामे महिला करत आपली संस्कृतीचे जतन करत होत्या



आता ती संस्कृती लोप पावत चालली आहे ती आजच्या ए आय च्या युगातील नवीन पिढीला ५० वर्षा पूर्वी महिला वर्ग कशी कामे करायची याची माहिती ओवी रंग या माध्यमातून लेखक व दिग्दर्शन ज्योती शिंदे, निर्मिती व सूत्रधार सुहासिनी घोरपडे, संगीत दिग्दर्शक सुखदा भावे –दाबके या तिघींनी मिळून सादर केला

अतिशय सुंदर असा कार्यक्रम खोपोलीत नाट्य रसिकाना ब्राम्हण सभा हॉल मधे पहायला मिळाला हा कार्यक्रम आता शाळा व कॉलेज मध्ये होणे गरजेचे आहे असे संजय पाटील यांनी आपल्या अभिप्राय मधे दिला आहे

या कार्यक्रम प्रसंगी इनरव्हील क्लब खोपोली च्या अध्यक्ष दिना शहा,सेक्रेटरी मधुमिता पाटील व सर्व सदस्य तसेच ब्राम्हण सभा खोपोली चे अध्यक्ष राजेंद्र पेठे, सेक्रेटरी वृषाली बेलसरे ,ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रवींद्र घोडके सर, लायन्स क्लब खोपोली चे अध्यक्ष अविनाश राऊत,रोटरी क्लब खोपोली चे माजी अध्यक्ष संजय पाटील,सह सेक्रेटरी संजय बोंडारडे व ब्राम्हण सभा खोपोली चे सर्व सदस्य उपस्थित होते

# पारंपरिक मातीची सुगड उरण बाजारात दाखल

**उरण : वार्ताहर**

मकरसंक्रांति बुधवार ( दि. १४) रोजी असल्याने पूजेसाठी लागणारी पारंपारिक मातीची सुगड उरण बाजारातविकावयास आले असून महिला वर्ग ते खरेदी करतांनालगबग दिसू लागली आहे .



पूजेसाठी लागणारी सामुग्री व मातीची सुगड आदीं वस्तुंची दुकानात ठेवण्यात आल्या आहेत .मातीची सुगड बाजार पेठेत ठीक – ठिकाणी विकाव्यास आल्या आहेत.

महाराष्ट्र स्वीट जवळ ,हरिलाल जनरल स्टोअर्स समोर ,राजपाल नाका गांधी चौक ,आदी ठिकाणीपूजेचे समान व मातीची सुगड विकावयास आली आहेत .

लहान मातीची सुगड ५० रुपयास ५ नग ,मोठी ५०रुपयास दोन ,व ६० रुपयास २ नग अश्या भावाने आम्हीविकतो असे कुंभारवाडा मुळेखंड येथील सुरेखा मनोहर कुंभार यांनी सांगितले .

# 'सार्वजनिक सण साजरे करताना आचारसंहितेचे दक्षतेने पालन करावे'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या अनुषंगाने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनानुसार आदर्श आचारसंहितेचे पालन केले जात आहे. निवडणूक आचारसंहितेमध्ये येणाऱ्या सार्वजनिक सणामधील आचरणाबाबत राज्य निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्वे विहित केलेली आहेत. राजकीय पक्षाचे नेते उमेदवार, कार्यकर्ते सण, उत्सवाच्या कार्यक्रमांमध्ये व्यक्तीगतरित्या सहभागी होऊ शकतात. तथापि या सण – उत्सवाच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्यांनी अथवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करू नये अथवा त्यासाठी कुठल्याही सार्वजनिक मंडळाचा आधार घेऊ नये.

निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये भोजनावळी किंवा जेवणाचे कार्यक्रमाचे आयोजन करू नये. दिनांक १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीचा सण येत असल्याने महिलांना वाण देण्याच्या उद्देशाने राजकिय पक्ष, उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी वस्तूंचे, पैशाचे वाटप करू नये. तसेच नागरिकांनी देखील या प्रलोभनाला बळी पडू नये.

मते मागण्यासाठी लाच देणे व लाच घेणे हा भारतीय न्याय संहिता मधील कलम १७० नुसार गुन्हा असून यासाठी एक वर्षाच्या कालावधीपर्यंत शिक्षा होऊ शकते. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी तीन शिफ्टमध्ये एकूण १८ भरारी पथके व १८ एसएसटी पथके कार्यरत असून या सर्वांची अशा घटनांवर २४ तास नजर राहणार आहे. कोणतीही अनुचित घटना होत असलेचे निदर्शनास आल्यास तात्काळ महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयास व संबंधित क्षेत्रीय कार्यालयात स्थापन केलेल्या आचारसंहिता कक्षास संपर्क करावा, असे आवाहन केले आहे.

# अंगणवाडी सेविका ते एलएलएमपर्यंत जीविता पाटील यांचा प्रेरणादायी प्रवास

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ऐन तारुण्यात पतीचे छत्र हरपल्यानंतर पदरात असलेल्या लेकासह जीवनाशी दोन हात करत शिक्षण, नोकरी आणि समाजकार्य या तिन्ही आघाड्यांवर यशस्वी वाटचाल करणाऱ्या अंगणवाडी सेविका जिवीता पाटील यांनी आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. एलएलबी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर आता त्यांनी एलएलएम ही पदव्युत्तर कायद्याची परीक्षा देखील यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे.



गेल्या १४ वर्षांपासून अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असलेल्या जिवीता पाटील यांच्या नावापुढे 'डव्होकेट' ही ओळख लागल्यानंतर आता एलएलएम पदवीधारक म्हणून त्यांची ओळख अधिक भक्कम झाली आहे. त्यांच्या या यशामुळे रायगड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व महिला वर्गामध्ये अभिमान आणि आनंदाचे वातावरण पसरले आहे.

जिवीता पाटील यांचे वय अवघे २१ वर्ष असताना पतीचे निधन झाले. एक वर्षाच्या मुलाला सोबत घेवून त्यांनी संघर्षमय जीवनाची सुरुवात केली. एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प, अलिबाग अंतर्गत चिखली विभागातील नवीन वाघविरा गावात अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असताना त्यांनी शिक्षणाची कास कधीही सोडली नाही. त्यांच्या सासू मनोरमा हरिश्चंद्र पाटील यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे व पाठिंब्यामुळे हा प्रवास शक्य झाला.

आर्थिक अडचणी असतानाही भाजी व्यवसाय करत त्यांनी को. ए. सो. लक्ष्मी शालिनी कला, विज्ञान व वाणिज्य महिला महाविद्यालय, पेझारी–पोयनाड येथून प्रथम श्रेणीत बी.ए. पदवी संपादन केली. त्यानंतर वाशी येथील एच.बी.बी. एड कॉलेजमधून बी.एड, तर मुंबई विद्यापीठातून एम.ए., एम.ए. एज्युकेशन, एम.फिल या पदव्युत्तर पदव्या प्राप्त केल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (खारघर शाखा) येथून एम.एस.डब्ल्यू पदवी प्रथम श्रेणीत मिळवली.

# क्षयरुग्णांना पोषक आहार वाटप; निक्षय मित्र महानगर गॅस कंपनीचा पुढाकार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

क्षयरोगमुक्त जिल्ह्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महानगर गॅस लिमिटेडने मुंबई यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीतून ५५० क्षयरुग्णांना ३ हजार ३०० पोषक आहार फूड बास्केटचे वितरण मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते जिल्हा परिषद, अलिबाग येथे करण्यात आले.



जिल्हाधिकारी किशन जावळे व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्याना निक्षय मित्र बनवून त्यांना फूड बास्केट वाटप देण्यासाठीचे अहवान केले होते त्यास प्रतिसाद देत महानगर गॅस लिमिटेड मुंबईने ही कार्यवाही केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सांगितले की, क्षयरोगमुक्त रायगड जिल्हा घडवण्यासाठी केवळ शासनाचेच नव्हे तर कॉर्पोरेट क्षेत्राचेही योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. अधिकाधिक कंपन्यांनी 'निक्षय मित्र' बनून क्षयरुग्णांच्या उपचार व पोषणासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. महानगर गॅस लिमिटेडने या उपक्रमातून रुग्णांच्या आरोग्य संवर्धनासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.प्राची नेहूलकर, महानगर गॅस लिमिटेडचे सहाय्यक उपाध्यक्ष (मानव संसाधन) संकेत धोत्रे, मुख्य व्यवस्थापक (CSR) सुसंता कुमार राउत, सहाय्यक व्यवस्थापक प्रियांका दळवी यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ताम्हिणी घाटातील खूनप्रकरणी आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**माणगाव : प्रतिनिधी**


ताम्हिणी घाटात अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला होता. सुरुवातीलाच पोलिसांनी घातपात असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्या दृष्टीने तपास करत दोन आरोपींना माणगाव पोलिसांनी अटक केली आहे.

तालुक्यातील पुणे दिघी महामार्गावर असलेल्या ताम्हिणी घाटातील मौजे सणसवाडी गावच्या हद्दीतील सीक्रेट पॉईंट जवळ दि. ११ जानेवारी रोजी एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला होता. फिर्यादी हे जागा दाखविण्यासाठी गेले गेले असता २५ ते ३० वर्षे, वयोगटातील पुरुष निपचिप अवस्थेत पडलेला दिसून आला. तत्काळ त्यांनी माणगाव पोलिसांना संपर्क साधला असता माणगाव पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

त्यावेळी मयत इसमाच्या अंगावर डाव्या बाजुच्या खांदयाच्या खाली, गळ्याला व डोक्याला जखमा झालेल्या दिसल्या. तसेच जमिनीवर सुखलेल्या रक्ताचे डाग दिसले. परंतु, सदर व्यक्तीची ओळख पटत नव्हती. मयत इसमाच्या अंगावरील खुणा पाहून घातपात असल्याचा संशय पोलिसांनी आला. त्यानुसार माणगाव पोलिसांनी शोध घेऊन पुणे येथून आरोपी अनिकेत महेश वाघमारे, वय २६ आणि तुषार उर्फ सोन्या शरद पाटोळे, वय २४, वर्ष, दोन्ही रा. पुणे यांना अटक केली


## दुखवटा

### विलास वाव्हळ



**पनवेल :** शिवसेना (उबाठा) राज्य कार्यकारणी सदस्य विलास वाव्हळ यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी शनिवार दिनांक १० जानेवारी रोजी कामोठे, पनवेल येथे दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी शांता, मुलगी प्राजक्ता, दोन भाऊ रामदास, नंदकुमार तीन बहिणी अलका, मंदा, शोभा तसेच पुतणे मयुरेश, पुतणी डॉ. मोनिका असा परिवार आहे.

### भाई तावडे



**खोपोली:** शहरातील राजकीय सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविणारे भाजपचे ज्येष्ठ नेते भाई तावडे यांचे वृद्धापकाळाने सोमवारी पहाटे निधन झाले. भाईंचे वय ८३ होते. त्यांच्या पश्चात पाच बहिणी तीन मुले एक विवाहित मुलगी सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे . भाई तावडे यांनी राष्ट्रवादी पक्षातून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला या प्रवेश डोळ्याला गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर परिकर हे उपस्थित होते.




रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १८ ◆ अंक १७७

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ मंगळवार, १३ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लवकरच 'दिबां'चे नाव दिले जाणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही ▌ विशेष मुलाखतीमध्ये विविध विषयांवर सकारात्मक भाष्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाणार असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. १२) येथे केला. यासाठी आवश्यक तो ठराव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवला असून लवकरच अधिकृत घोषणा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**



पनवेल शहराला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देणारे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष मुलाखतीचा कार्यक्रम कळंबोली येथे झाला. सुमारे ४० मिनिटे चाललेल्या या संवादात अभिनेता प्रसाद ओक आणि अभिनेत्री अमृता खानिवलकर यांनी मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमासाठी १००हून अधिक गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी व रहिवासी उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्र्यांनी 'व्हिजन २०३० पनवेल' ही संकल्पना मांडत येथील सर्वांगीण विकासाचा आराखडा सादर केला.

या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, डॉ. गिरीश गुणे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे आदी मान्यवरांसह विविध सोसायट्यांचे प्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मुलाखतीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी पनवेल, नवी मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यातील विकासाचा सविस्तर आराखडा उलगडून सांगितला. पाणी, वाहतूक, विमानतळ, मालमत्ता कर, नैना प्रकल्प, स्वयंपुनर्विकास योजना अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी भूमिका मांडली.

पनवेलमधील पाण्याच्या विषयावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी न्हावाशेवा टप्पा-३मधून ६५ एमएलडी पाणी पनवेलला देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. याशिवाय मुंबई महानगर प्रदेशाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पोशीर आणि शिलार ही दोन धरणे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून एमएमआरडीए खर्च उचलणार, पाटबंधारे विभाग काम करणार आणि राज्य सरकार कर्जाची हमी देणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिलार धरणासाठी ३६०० कोटींचा संपूर्ण बोजा पालिकेवर पडणार नाही, केवळ काही हिस्सा पनवेल महापालिकेला द्यावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मालमत्ता कराच्या मुद्यावर मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. कर माफ करण्याची आश्वासने ही निवडणूक जिंकता येणार नाही हे माहीत असल्याने दिली जात असल्याचा टोला त्यांनी लगावला. जे निवडून येणार नाहीत ते ताजमहाल देतो, मोटार देतो अशी खोटी आश्वासने देतात; त्यात कोणाच्या बापाचे काही जात नाही, अशा उपरोधिक शब्दांत त्यांनी विरोधकांची खिल्ली उडवली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाभोवती ५७५ चौरस किलोमीटरचे नैना क्षेत्र, एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि मेडिसिटी उभारली जाणार असून त्यामुळे पनवेल-नवी मुंबई परिसरात सुमारे सहा लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था उभी राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून कळंबोली सर्कल येथे ७५० कोटींचे उड्डाणपूल व रस्ते प्रकल्प सुरू असल्याचे तसेच सिडकोकडून ५९ किलोमीटरची मेट्रो मार्गिका उभारली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पुढील तीन वर्षांत या सर्व प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा दावा त्यांनी केला.

धोकादायक व जीर्ण इमारतींसाठी स्वयंपुनर्विकास धोरणामुळे रहिवाशांना कमी किमतीत दुप्पट क्षेत्रफळाची सदनिका मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

मुंबईतील विमानतळ बंद होणार नाहीत, उलट त्यांची क्षमता दीडपट वाढवली जाईल, असे सांगत लंडनप्रमाणे मुंबईला अनेक विमानतळांची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले. या सर्व पार्श्वभूमीवर भविष्यातील पनवेल घडवण्यासाठी महायुतीला मतदान करा, असे आवाहन करत मुख्यमंत्र्यांनी प्रचाराचा शेवट केला. विकासाच्या मोठ्या स्वप्नांसह सादर केलेले 'व्हिजन २०३० पनवेल' हेच आगामी निवडणुकीतील महायुतीचे प्रमुख शस्त्र ठरणार असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

**(सविस्तर मुलाखत उद्याच्या अंकात)**

# कोणी कितीही बोटे मोडली तरी महायुतीच जिंकणार!

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची फटकेबाजी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे पनवेलचा बुलंद आवाज आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेत विकासाची गंगा आणली आहे. आमच्या रिपब्लिकन पक्षाचा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. येथील विकासकामांचा प्रवाह अशाच पद्धतीने सुरू राहणार असून येणाऱ्या १५ तारखेला भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी कामोठे येथे प्रचार सभेत केले.

पनवेल महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आपीआय महायुतीच्या प्रभाग क्रमांक ११, १२ आणि १३ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन रविवारी (दि. ११) करण्यात आले होते. त्या वेळी ना. आठवले यांनी आपल्या खास शैलीत 'आमच्या नावाने कोणी कितीही मोडली बोटे, तरी महायुतीच जिंकणार आहे कामोठे', असा विश्वास व्यक्त केला.

या सभेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, आरपीआयचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, जितेंद्र म्हात्रे, प्रभाग क्रमांक ११चे उमेदवार निलम मयूर मोहिते, प्रदीप भगत, हॅप्पी सिंग; प्रभाग १२चे उमेदवार प्रभाकर कांबळे, विद्या तामखडे, कुसूम म्हात्रे, दिलीप पाटील; प्रभाग १३चे उमेदवार रवींद्र जोशी, विकास घरत, हेमलता गोवारी, शिला भगत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हटले की, विरोधकांना उमेदवार शोधावे लागले आणि शोधलेल्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले, मात्र आरोप आमच्यावर करतात. महाविकास आघाडीची आता महाभकास आघाडी झाली आहे. महायुतीचे उमेदवार खंबीर आहेत. प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्व कार्यकर्ते एकजुट झाले आहेत. प्रभाग ११,१२ आणि १३ मधील ११ जणांची टीम आहे आणि ती एकत्रित महापालिकेत विजयी होईल. **(पान ८ वर..)**

### 'पनवेल परिसराच्या विकासाचे श्रेय लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे'

या वेळी आमदार गोपीचंद पडळकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेल परिसरात झालेल्या सर्व विकासकामांचे श्रेय लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे आहे. राज्यातील कानाकोपऱ्यामधून नागरिक कामोठे वसाहतीमध्ये वास्तव्यास आले आहेत. त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा देण्याचे काम भाजप महायुती करीत आहे. अमृत योजनेमध्ये राज्यातील ४०० शहरांना केंद्र सरकारने ५० हजार कोटी रुपयांच्या निधी दिला. त्यापैकी कोट्यवधी रुपयांचा निधी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेकडे आणला आहे. अनेक विकासाची कामे भाजप महायुतीने केली आहेत. त्यामुळे आपल्याला सर्व ताकदीने भाजप महायुतीसोबत राहायचे आहे आणि येणाऱ्या १५ तारखेला निशाणीसमोरील बटन दाबून महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# पनवेल महापालिकेत महायुती भक्कम -मंत्री शिवेंद्रराजे भोसले

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**




पनवेल महापालिकेत भक्कम अशी महायुती झालेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे आपले तिन्ही नेते खंबीरपणे तुमच्या पाठीशी आहेत. त्यामुळे महायुती हा एकच पर्याय असून विरोधात कुणी काय बोलतोय, काय करतोय याकडे लक्ष न देता येथील परिसराच्या अविरत विकासासाठी कमळ, धनुष्यबाण आणि घड्याळ चिन्हासमोरील बटण दाबून महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी येथे केले.

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ७, ८, ९, १०मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य सभा रविवारी (दि. ११) कळंबोली सेक्टर ३मधील सुएसो जुनी शाळा येथे झाली. त्या वेळी मंत्री भोसले बोलत होते.

या सभेला महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, शिवसेनेचे तुकाराम सरक, राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, गणेश कडू, भाजप भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, महायुतीचे प्रभाग क्रमांक ७मधील उमेदवार अमर पाटील, मनाली अमर ठाकूर, प्रमिला रविनाथ पाटील, राजेंद्रकुमार शर्मा; प्रभाग क्रमांक ८चे उमेदवार बबन मुकादम, रामदास शेवाळे, बायजा बबन बारगजे, सायली तुकाराम सरक; प्रभाग ९चे उमेदवार महादेव मधे, प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती निलेश भोईर, शशिकांत शेळके; प्रभाग क्रमांक १०मधील उमेदवार रवींद्र भगत, सरस्वती नरेश काथारा, मोनिका प्रकाश महानवर, विजय खानावकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान ८ वर..)**

### महिलांना अधिक सक्षम करणार -ना. आदिती तटकरे

या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी, कुणी कितीही संभ्रम निर्माण केला तरी लाडकी बहीण योजना सुरू राहणार आहे. महिलांना सशक्त करण्यासाठी आमदार प्रशांतदादांमुळेही कामे झाली. पुढील कालावधीत येथे बचत गटांना अधिक सक्षम करण्यासाठी सवलतीच्या दरात कर्ज वाटप करून रोजगार निर्मितीसाठी काम करणार आहोत. त्याचप्रमाणे अधिकाधिक पिंक रिक्षा पनवेलमध्ये धावतील आणि त्यातून माता-भगिनींना रोजगार मिळेल, असे अभिवचन दिले.

## संपादकीय

# आंदोलनातून मोठा संघर्ष?

जगाच्या निरनिराळ्या भागांमध्ये सध्या सुरू असलेल्या संघर्षाला आर्थिक घडामोडींची पार्श्वभूमी आहे. अमेरिकेसारख्या आजवर विस्तारवादाविरोधात असलेल्या देशाने अलीकडच्या काळात ग्रीनलँड, कोलंबिया आणि मेक्सिकोसारख्या देशांवर कब्जा करण्याची भाषा केली आहे. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेकडून इराणमधील उग्र आंदोलनाला दिला जात असलेला उघड पाठिंबा जगाच्या भिवया उंचावणारा ठरला आहे.


**गेला काही काळ जगातील निरनिराळ्या भागांमध्ये संघर्ष उफाळून येताना दिसतो आहे. कुठे हा संघर्ष दोन देशांमधील आहे, तर कुठे एखाद्या देशामध्ये तेथील जनताच सत्ताधाऱ्यांविरोधात हिंसक आंदोलन पुकारून उभी ठाकलेली दिसते आहे. नुकतीच अशा देशांच्या यादीत इराणची भर पडली आहे. काही दिवसांपूर्वी इराणच्या तेहरान आणि अन्य एका शहरात देशातल्या ढासळत्या आर्थिक परिस्थितीविरोधात व्यापारी आणि व्यावसायिकांच्या शांततापूर्ण आंदोलनाला सुरुवात झाली आणि बघता बघता हे आंदोलन इराणभर पसरले. त्या देशातील सत्ताधाऱ्यांकडून मग संपूर्ण इराणमध्ये इंटरनेट सेवा बंद करण्यात आली. सुरुवातीच्या आंदोलनात निदर्शक इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांना हटवण्याची मागणी करताना दिसले. तसेच इराणचे शेवटचे शाह महंमद रझा शाह पहलवी यांचे चिरंजीव रझा पहलवी यांच्या परतण्याच्या घोषणाही काही निदर्शकांनी दिल्या. इराणमध्ये जनआंदोलन अधुनमधून होतच असते. यातील काही आंदोलने उग्रही होती. आताही तेहरानच्या भव्य बाजारपेठेतून सुरू झालेल्या आंदोलनातून त्या देशातील धर्मसत्ताक राजवटीला तेथील जनतेने आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. महागाईविरोधातील या आंदोलनाला हिंसक वळण लागले असून अमेरिकास्थित मानवाधिकार संस्थांच्या माहितीनुसार एव्हाना या आंदोलनात पाचशेहून अधिक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. या आंदोलनाला सुरुवात झाली त्यापाठोपाठच अमेरिकेने व्हेनेझ्युएलामध्ये जाऊन तेथील अध्यक्षांना ताब्यात घेतले होते. नंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमध्येही अमेरिका कारवाई करू शकते असा इशारा दिला. त्यामुळेच इराणमधील संघर्ष आता काय स्वरुप घेतो याविषयी जगभरात चिंता व्यक्त होते आहे. इराणमधील लोकांना सत्तापालट हवा आहे. इराण कधी नव्हे ते स्वातंत्र्याच्या प्रतिक्षेत आहे असे म्हणत ट्रम्प यांनी इराणमधील आंदोलकांना समाज माध्यमांवरून पाठिंबा व्यक्त केला आहे. अमेरिका आंदोलकांना मदत करण्यास तयार आहे असेही त्यांनी म्हटले आहे. यानंतर व्हेनेझ्युएलामध्ये घडवला तसा सत्तापालट अमेरिकेला इराणमध्ये घडवता येईल का असा प्रश्न चर्चिला जातो आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये इस्रायल-इराण संघर्षात अमेरिकेने इराणच्या अणुस्थळांना लक्ष्य केले होते. आपण इराणची तिन्ही अणुस्थळे पूर्णपणे नष्ट केल्याचा दावा ट्रम्प यांनी तेव्हा केला होता. तर आण्विक सुविधांवर हल्ला झाला पण आपले कोणतेही मोठे नुकसान झाले नाही असे इराणने म्हटले होते. इराणची युद्धक्षमता मोठी आहे. त्यामुळेच अमेरिकेला व्हेनेझ्युएलाप्रमाणे इराणमध्ये कारवाई करता येणार नाही असा सूर जागतिक विश्लेषक लावतात. इराणचे सरकार यंत्रणेद्वारे निदर्शनांना दडपत असून व्यापक इंटरनेट बंदी हा त्याचाच भाग मानला जातो आहे. इराणमधील आंतरराष्ट्रीय फोनसेवा देखील बंद आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यास अमेरिकी लष्कर आणि इस्रायलला इराण लक्ष्य करील असा इशाराही इराणी पार्लमेंटने दिला आहे. तेथील आंदोलनाची वाढलेली व्याप्ती, अमेरिकेचा आंदोलकांना उघड पाठिंबा, रझा पहलवी यांनी देशाबाहेरून आंदोलकांना दिलेले बळ या साऱ्या घटकांमुळे इराणमधील आंदोलन यंदा कुठल्या दिशेने जाणार याकडे अवघे जग लक्ष ठेवून आहे.**

# प्रकल्पग्रस्तांचे अध्वर्यू दि.बा. पाटील

रायगड जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे अध्वर्यू अशी दि.बा. पाटील यांची ओळख सांगितली जाते. माजी खासदार, आमदार व पनवेल नगराध्यक्ष दिनकर बाळू पाटील हे रायगड जिल्ह्यासहीत संपूर्ण महाराष्ट्राला दि.बा. पाटील नावाने परिचित आहेत. 'दिबा' हे महाराष्ट्रातील उत्तर कोकणातल्या शेतकरी, कष्टकऱ्यांचे नेते होते. त्यांच्या आईचं नाव माधूबाई तर वडिलांचं नाव बाळू गौरू पाटील होतं. 'दिबां'चे वडील शेतकरी आणि शिक्षक होते. 'दिबां'चा जन्म जासई गावामध्ये १३ जानेवारी १९२६ रोजी झाला.

'दिबां'च्या वडिलांचा जासई गाव आणि आजूबाजूच्या गावांत शिक्षणाचे महत्त्व प्रस्थापित करण्यात मोठा वाटा होता. वडील शिक्षण प्रसाराचे काम करत असूनही दि.बा. पाटील यांचे शिक्षण अतिशय खडतर परिस्थितीत झाले. पुण्यामध्ये त्यांनी वकिलीचे शिक्षण घेतले. त्यांचे बंधू आत्माराम बाळू पाटील यांनी देखील 'दिबां'च्या शिक्षणासाठी मोठा हातभार लावला. दि.बा. पाटील यांच्या पत्नी ऊर्मिला या पनवेल येथील के. व्ही. कन्या विद्यालयात शिक्षिका होत्या.



दि.बा. पाटील हे पनवेल पालिकेचे नगराध्यक्ष, महाराष्ट्राचे पनवेल-उरण विधानसभा मतदारसंघाचे चार वेळा आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि रायगडचे दोन वेळा खासदार होते. सिडको (सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन) ही सरकारी संस्था त्यावेळी नवी मुंबईची बांधणी करत होती. त्या काळात दि. बा. पाटलांनी नवी मुंबई सिडको आणि जेएनपीटी (न्हावा शेवा बंदर) प्रकल्पग्रस्त जनतेचे खंबीर नेतृत्व केले. शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी सारे आयुष्य झिजवले. पोलिसांचा लाठीमार सहन केला तसेच कारावासही पत्करला. साधी राहणी, उच्च विचारसरणी असणाऱ्या या नेत्याच्या एका हाकेला हजारो, लाखोंच्या संख्येने ओ देणारे कार्यकर्ते होते.

दि.बा. पाटलांची विधिमंडळातील अभ्यासपूर्ण भाषणे गाजली. 'दिबा' उभे राहिले म्हणजे सत्ताधारी पक्षांच्या गोटात शांतता पसरत असे. आज सिडकोने नवी मुंबई पूर्णपणे व्यापली आहे. याच नवी मुंबईसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जात असताना त्या दहा-वीस हजार रुपये एकरी भावाने घेतल्या जाणार होत्या. महाराष्ट्रात स्वातंत्र्याच्या चळवळीत अष्टी किंवा चिरनेर येथे जे जोरदार लढे झाले त्या लढ्यासारखाच सिडकोविरोधातला शेतकऱ्यांच्या हिताचा लढा दि.बा. यांनी लढवला. जासई येथील लढाईत पाच शेतकरी मारले गेले, शंभर जखमी झाले. पोलिसांच्या गोळीबाराचा सामना करून शेतकऱ्यांनी ही लढाई जिंकली आणि सरकारकडून सिडको परिसरातील जमिनीचा जास्तीत जास्त भाव मिळवला. २०१२ साली अखेरचा लढा देत जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांच्या साडेबारा टक्के भूखंडाची मागणी सरकारकडून मान्य करून घेतली. रायगड आणि नवी मुंबईतील भूमीपूत्र असलेल्या आगरी जनतेबरोबर त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. ते शेवटपर्यंत कष्टकऱ्यांसाठी लढले.

१६ आणि १७ जानेवारी १९८४ साली 'दिबां'च्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. याच दिवशी सध्या जेएनपीटी बंदरासाठी विस्थापित करण्यात आलेल्या नवीन शेवा गावात पोलिसांनी शेतकऱ्यांवर पहिला गोळीबार केला होता. त्यानंतर पेटलेल्या या आंदोलनाने उग्र रूप धारण केल्याने १६ जानेवारी रोजी दास्तान फाटा येथे झालेल्या आंदोलनात दोन शेतकऱ्यांनी हौतात्म्य पत्करले, तर दुसऱ्या दिवशी १७ जानेवारी रोजी नवघर फाटा येथे झालेल्या गोळीबारात तीन शेतकऱ्यांनी आपले आत्मबलिदान केले होते.

२५ जून २०१३ रोजी हृदयविकाराने 'दिबां'चे निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्यामागे दोन मुले, दोन मुली, स्नुषा, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पनवेल येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मागील काही वर्षांपासून 'दिबां'ना श्वसनाचा तसेच छातीतील कफाचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. येथेच उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला व त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांचा मृतदेह आधी त्यांच्या पनवेल येथील (संग्राम) घरी नेण्यात आलेला. रायगडमधील सर्वपक्षीय नेत्यांनाही 'दिबां'च्या अंत्यदर्शनासाठी उपस्थित लावली होती. त्यानंतर त्यांचे पार्थिव दुपारी उरण-पनवेल आगरी समाजाच्या महात्मा फुले सभागृहात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी मोठा जनसमुदाय लोटला होता. या अंत्ययात्रेत हजारोच्या संख्येने 'दिबा' समर्थक आणि स्थानिक सहभागी झालेले.

### शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी आयुष्यभर झटणारा योद्धा

- १९५७-१९६२,१९६२-१९६७,१९६७-१९७२,१९७२-१९७७, १९८०-१९८४ असे पाच वेळा विधानसभेवर निवडून आले.
- १९६० - पहिले हायस्कूल जासई गावात सुरू केले. त्यानंतर १० माध्यमिक शाळा सुरू केल्या.
- १९६७ ते १९७२ - महाराष्ट्र राज्य शेतकरी सभेचे अध्यक्ष.
- १९७० - पनवेल वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय स्थापन केले.
- १९७०पासून आजपर्यंत सिडको संग्राम चालूच आहे. १९८४चा सिडको लढा देशभर गाजला. प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्केचा लाभ झाला. अजूनही जेएनपीटीचा लढा चालू आहे.
- १९७२-१९७७ - विधानसभेचे पक्ष प्रतोद. अंदाज समिती, लेखा समिती, उपविधान समिती, आश्वासन समिती आदी समित्यांवर लक्षवेधी काम केले.
- १९८२ -८३ विधानसभेचे विरोधी पक्षनेते
- १९७४ - पनवेल नगर परिषदेचे अध्यक्ष झाले.
- १९७५-च्या बेळगाव-कारावारसाठीच्या आंदोलनात ११ महिन्यांचा तुरुंगवास.
- १९७७-१९८४ - खासदार म्हणून दोन वेळा निवडून आले.
- १९९६ - महाराष्ट्र शासनाचा पहिला उत्कृष्ट वक्ता संसदीय पुरस्कार. आगरी दर्पण मासिकाचे नियमित प्रकाशन सुरू केले.
- म.फुले, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांचे आग्रही प्रचारक.
- आगरी कोळी कराडी अशा भूमिपुत्रांचे श्रद्धास्थान, मार्गदर्शक, लोकनेते.
- २०१३ - पनवेल येथे त्यांच्या राहत्या घरी निधन.

## बदलते तंत्रज्ञान

# सुझुकीची इलेक्ट्रिक स्कूटर भारतात लॉन्च

सुझुकी मोटरसायकल इंडियाने आपली पहिली इलेक्ट्रिक स्कूटर e-Access भारतात लॉन्च केली आहे. याची एक्स-शोरूम किंमत १.८८ लाख रुपये ठेवण्यात आली आहे.



स्कूटरमध्ये ३.०७ kWh ची LFP बॅटरी देण्यात आली आहे, जी एकदा चार्ज केल्यावर ९५Km पर्यंतची रेंज देते. कंपनीने डीलरशिपवर याची बुकिंगही सुरू केली आहे.

सुझुकी e-Access चे स्पेसिफिकेशन्स

e-Access मध्ये परमनंट मॅग्नेट मोटर बसवण्यात आली आहे, जी ५.५ bhp ची पीक पॉवर आणि १५ Nm टॉर्क देते. याचा टॉप स्पीड ७१Km प्रति तास आहे. स्कूटरचे वजन १२२Kg आहे आणि सीटची उंची ७६५ mm ठेवण्यात आली आहे. यात १२ इंचाचे अलॉय व्हील्स आहेत, पुढे डिस्क ब्रेक आणि मागे ड्रम ब्रेक मिळतो.

चार्जिंगबद्दल बोलायचे झाल्यास, पोर्टेबल चार्जरने पूर्ण चार्ज होण्यासाठी ६ तास ४० मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागतो, तर कंपनीच्या DC फास्ट चार्जरने २ तासांत पूर्ण चार्ज होते. सुझुकीच्या २४०पेक्षा जास्त शोरूममध्ये DC फास्ट चार्जर आणि सर्व डीलरशिपवर AC चार्जर उपलब्ध आहेत. स्कूटर चार ड्युअल-टोन कलर पर्यायांमध्ये येते. यात ब्लॅक/रेड, व्हाईट/ग्रे, ग्रीन/ग्रे आणि ब्लू/ग्रे यांचा समावेश आहे. डिझाइन पेट्रोल क्सेसपेक्षा खूप वेगळी आहे, पुढे LED लाइटिंग आणि स्पोर्टी लुक देण्यात आला आहे.

e-Access ची किंमत तिच्या सेगमेंटमध्ये सर्वाधिक आहे. बजाज चेतकच्या टॉप व्हेरिएंटपेक्षा ही ५० हजार रुपयांपेक्षा जास्त महाग आहे तसेच याची किंमत TVS iQube ST (५.३ kWh बॅटरी असलेली) आणिAther Riztaच्या ३.७ kWh व्हेरिएंटपेक्षाही ३० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. पेट्रोल ॲक्सेसच्या टॉप मॉडेलपेक्षा दुप्पट किमतीत हे इलेक्ट्रिक व्हर्जन आले आहे.

सुझुकी मोटरसायकल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक केनिची उमेदा यांनी सांगितले की, e-Access हे कंपनीचे पहिले जागतिक धोरणात्मक बॅटरी इलेक्ट्रिक वाहन आहे. यात दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, उत्तम हाताळणी, स्मूथ एक्सीलरेशन आणि उच्च दर्जाचे फिट अँड फिनिश देण्यात आले आहे.

# अंतराळवीर राकेश शर्मा

अंतराळात प्रवास करणारे पहिले आणि एकमेव भारतीय नागरिक राकेश शर्मा यांच्याबद्दल सर्वांनाच माहीत आहे. त्यांचा जन्म आजच्याच दिवशी १९४९ रोजी झाला. राकेश शर्मा हे पहिले भारतीय अंतराळवीर आहेत. त्यांच्यानंतर आजपर्यंत एकही भारतीय अंतराळात गेला नाही. कल्पना चावला आणि सुनीता विल्यम्स याही अंतराळात गेल्या, पण त्या भारतीय वंशाच्या आहेत, भारतीय नागरिक नाही.



निमित्त

राकेश शर्मा यांचा जन्म पंजाबमधील पटियाला येथे झाला. तृप्ता शर्मा हे त्यांच्या आईचे नाव आणि देवेंद्र शर्मा हे त्यांच्या वडिलांचे नाव होते. मुलाच्या जन्मानंतर राकेशचे पालक हैदराबाद (आंध्र प्रदेश) येथे स्थलांतरित झाले. राकेशला त्याच्या शिक्षणासाठी सेंट जॉर्ज व्याकरण शाळेत दाखल करण्यात आले. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर राकेश हे पदवीसाठी हैदराबादमधील उस्मानिया विद्यापीठात गेले. १९६६मध्ये ग्रॅज्युएशनच्या वेळी त्यांची राष्ट्रीय सुरक्षा अकादमीसाठी निवड झाली आणि ते प्रशिक्षणात गेले.

राकेश शर्मा १९६६मध्ये एनडीए उत्तीर्ण झाल्यानंतर १९७०मध्ये भारतीय हवाई दलात कॅडेट म्हणून दाखल झाले. त्यानंतर त्यांचे नशीब चांगलेच बदलले. राकेश पुढे गेला तो फक्त २१ वर्षांचा असताना भारतीय हवाई दलात दाखल झाला. १९७१च्या भारत-पाकिस्तान युद्धात राकेश शर्मांच्या मिग एअरक्राफ्ट या विमानाला प्रचंड यश मिळाले. या लढाईमुळे राकेश शर्मा प्रसिद्ध झाले आणि अनेकांनी त्यांच्या क्षमतेचे कौतुक केले. अत्यंत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट काम कसे पूर्ण करता येते हे शर्मा यांनी दाखवून दिले.

राकेश शर्मा हे भारताचे पहिले अंतराळवीर आहेत. अंतराळात जाणारे ते जगातील १३८ वे आणि भारतातील पहिले व्यक्ती होते. शिक्षण पूर्ण करून ते हवाई दलात दाखल झाले. सप्टेंबर १९८२मध्ये त्यांची स्पेस प्रोग्रामसाठी निवड झाली. सोव्हिएत रॉकेट सोयूझ टी-११ २ एप्रिल १९८४ रोजी अंतराळात सोडण्यात आले. ते तेथे सुमारे आठ दिवस राहिला. भारत सरकारने त्यांना अशोक चक्र प्रदान केले आणि सोव्हिएत युनियनने त्यांना सोव्हिएत युनियनचा नायक हा मान बहाल केला.

जेव्हा राकेश शर्मा इतर दोन सोव्हिएत अंतराळवीरांसह सोयुझ टी-११ अंतराळयानातून अंतराळ प्रवासाला निघाले होते. प्रवासादरम्यान त्यांनी अवकाशातून उत्तर भारताची अनेक छायाचित्रे घेतली. त्यांनी गुरुत्वाकर्षणाशिवाय सात दिवस, २१ तास, ४० मिनिटे अंतराळात उड्डाण केले,तसेच योगाभ्यास केला. राकेश शर्मा हे अंतराळात जाणारे जगातील १३८वे अंतराळवीर होते. राकेश शर्मा यांचा अवकाश प्रवास हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा विषय आहे.

कर्नल पीएन शर्मा यांची मुलगी मधु शर्मा ही राकेश शर्मा यांची पत्नी आहे. राकेश शर्मा निवृत्तीनंतर ते साधे जीवन जगू लागले आहेत. ते त्यांच्या पत्नीसोबत गावी निवांत आयुष्य जगत आहे. ते मीडिया आणि लाइम लाईटपासून दूर राहणे पसंत करतात, पण देश सेवेसाठी तत्पर असतात. ते भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्रो'च्या गगनयानसाठीच्या राष्ट्रीय सल्लागार समितीचे सदस्य होते. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# 'असे' होतील केस घनदाट, काळे अन् लांबसडक!

केस निरोगी आणि चमकदार असावेत, अशी प्रत्येकाची इच्छा असते, मात्र बदलत्या वातावरणामुळे अनेकांना केसांसंबंधित समस्यांना तोंड द्यावे लागतेय. त्यातही बहुतांश लोक केसगळतीच्या समस्येने त्रस्त आहेत. निरोगी केसांसाठी बदाम तेल, मोहरीचे तेल, कढीपत्ता, मेथीचे दाणे यांच्यापासून घरच्या घरी तयार केलेले एक नैसर्गिक तेल फायदेशीर ठरत असल्याचे सांगितले जात आहे.



आहारतज्ज्ञ लीमा महाजन यांनी एका इन्स्टाग्राम व्हिडीओच्या माध्यमातून हे नैसर्गिक तेल केसांच्या उत्तम असल्याचे सांगितले आहे, पण खरेच हे नैसर्गिक तेल केसांच्या वाढीस उपयुक्त ठरू शकते का यावर मुंबईतील भाटिया रुग्णालयाचे त्वचाशास्त्रज्ञ, कॉस्मेटोलॉजिस्ट, त्वचारोग तज्ज्ञ व केस प्रत्यारोपण सर्जन डॉ. सौरभ शाह यांनी सविस्तर माहिती दिली.

एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, रोझमेरी तेल केसांसाठी उत्तम काम करते. या तेलाचा रोज वापर केल्यास तीन ते सहा महिन्यांत परिणाम दिसू लागतात. मेथीचे दाणे केसांच्या मुळांचे पोषण करून आणि टाळूमध्ये रक्त परिसंचरण वाढतात. तसेच केसांच्या वाढीस मदत करतात.

मेथीच्या दाण्यांमध्ये असलेली प्रथिने केसांची मुळे मजबूत करून, केसगळती कमी करतात आणि निरोगी केसांच्या वाढीस प्रोत्साहन देतात तसेत कढीपत्त्यात असलेली प्रथिने आणि बीटा कॅरोटीनमुळे तुमच्या केसांची मुळे मजबूत होण्यास मदत होते, असे आहारतज्ज्ञ महाजन म्हणाल्या.

एका पॅनमध्ये मोहरीचे तेल गरम करा. त्यात रोझमेरीची पाने, कढीपत्ता व मेथीचे दाणे घाला. तेलाचा थोडा रंग बदलला आणि सर्व गोष्टी चांगल्या प्रकारे मिक्स झाल्याचे दिसले की, गॅस बंद करा. आता हे तेल थंड होऊ द्या. त्यानंतर एका काचेच्या बरणीत किंवा बाटलीमध्ये ते ठेवा. हे तेल बनवताना त्यात बदाम आणि एरंडेल तेलाचे प्रमाण एकसमान घ्या.

केस गळण्याच्या समस्येपासून सुटका मिळण्यासाठी मोहरीचे तेल फायदेशीर आहे. मोहरीचे तेल कोरड्या आणि निर्जीव केसांना पोषण देण्याचे काम करते. त्यात अल्फा फॅटी सिड असते, जे केसांना ओलावा पुरवतात तसेच केसांना ते नॅचरल कंडिशनिंग इफेक्ट देतात. मोहरीच्या तेलाने केसांना तसेच टाळूला मालिश केल्याने रक्ताभिसरण सुधारते. त्यामुळे केस मुळापासून मजबूत होतात आणि तुटत नाहीत.

# कचऱ्याचे डंपिंग प्रश्नांकित, प्रक्रिया केंद्राची अवस्थाही दयनीय

**माणगाव : बातमीदार**

माणगांव नगरपंचायत हद्दीतील कचरा प्रक्रिया केंद्रात साचलेले कचऱ्याचे डोंगर हटवण्यात प्रशासनाला जरी यश आले असले, तरी दररोज नवनिर्मित होणाऱ्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरित आहे.

काही महिन्यांपूर्वी या ठिकाणी कचऱ्याचे प्रचंड ढिगारे तयार झाले होते. नागरिकांच्या तक्रारी, पर्यावरणीय धोके आणि दुर्गंधीमुळे प्रशासनाने हालचाल करत आश्रमशाळा लगतचा जुना कचरा हटवण्याची मोहीम राबवली. मात्र ही मोहीम केवळ तात्पुरता दिलासा देणारी ठरत असल्याची भावना आता व्यक्त होत आहे.

दररोज माणगांव शहरातून मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा या केंद्रावर येत असून, कचरा वर्गीकरणाचा अभाव, प्रक्रिया यंत्रणा अपुरी, जागेची कमतरता, कर्मचारी व देखरेखीचा अभाव यामुळे नवा कचरा पुन्हा एकदा डंपिंग स्वरूपात नवीन ठिकाणी साचण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.



सध्याची परिस्थिती पाहता माणगांव कचरा प्रक्रिया केंद्राची अवस्था देखील दयनीय दुर्लक्षित झाली आहे. कोणत्याही प्रकारे कचरा प्रक्रीयेचे काम येथे सुरु नाही. लाखो रुपयांच्या मशीन या प्रकल्पासाठी आणुन ठेवल्या मात्र तिथे कचरा पेटवून देताना त्याच्या वायर देखील जळल्या असल्याचे निदर्शनास आले. या नवीन प्रकल्पासाठी उभारण्यात आलेल्या शेड मध्ये गुरे कचरा खाण्यासाठी जमलेली असतात. कोणताही कर्मचारी इथे दिसुन येत नाही.

### प्रक्रिया केंद्राबाहेर कचऱ्याचे डोंगर

***कचरा जसा आधी बाहेर टाकला जायचा आणि त्याचे मोठे डोंगर तयार होत होते तसेच आता या प्रक्रिया केंद्राबाहेर कचरा ओतला जात असुन त्याचे प्रक्रिया केंद्राबाहेर होताना दिसत आहेत. पुन्हा दुर्गंधी आणि कचरा पेटवून देणे म्हणजे डंपिंगच्या कचऱ्यातुन येणाऱ्या दुर्गंधी, जाळून होणाऱ्या धूराचा आरोग्यावर विपरित परिणाम हे दुष्टचक्र अजून कायमच राहणार आहे. डंपिंग मुक्त माणगाव म्हणताना फक्त एका जागेवरुन कचऱ्याचे डोंगर दुसऱ्या जागी होतानाचे चित्र दिसून येत आहे.***

जर याठिकाणी वेळीच नियमित कचरा वर्गीकरण, कंपोस्टिंग आणि पुनर्प्रक्रिया रिसायकलिंगची प्रभावी यंत्रणा उभी राहिली नाही, तर भविष्यात पुन्हा तेच ते कचऱ्याचे डोंगर उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकडे माणगांव नगरपंचायत प्रशासन कटाक्षाने, गांभीर्याने लक्ष देणार का? की आता फक्त जुना कचरा हटवून कर्तव्य संपल्याचे समाधान मानले जाणार? असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# खारीकवाडा परिसरात दोन घरांना आग; हजारो रुपयांचे नुकसान

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील उसरोल ग्रामपंचायत भागातील खारीकवाडा परिसरात आज सकाळी दहा वाजता आग लागल्याने दोन घरांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

खारीकवाडा परिसरातील रमेश हरीचंद्र पाटील यांच्या पत्नी मंदा पाटील या आज सोमवार असल्याने सकाळच्या प्रहरी देवासमोर दिवा लावून भगवान शंकर मंदिरात अभिषेक घालण्यासाठी गेल्या होत्या. परंतु दिव्याने पेट घेतल्याने हळू हळू आग वाढत जाऊन ती छप्पर पर्यंत पोहचली. खारीकवाडा परिसरात जवळ जवळ घरे असल्याने या घराला लगत असणारे घर प्रभाकर हरीचंद्र पाटील यांच्या सुद्धा घराला आग लागली. घरातील माणसे बाहेर असल्याने ही बाब लक्षात आली नाही.

परंतु कौलातून धूर येऊ लागल्याने असंख्य मदतीचे हात धावून आले. आगरी समाज खारीकवाडा, परीट समाज तसेच मुस्लिम समाज श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव या शाळेतील इयत्ता नववी दहावीचे विद्यार्थी व शिक्षक हे सुद्धा या ठिकाणी पोहचून आग विझविण्यासाठी मोलाची मदत केली. मुरुड नगरपरिषद अग्निशामक दल सुद्धा येथे आले होते परंतु वेळीच आग विझल्याने त्यांना विशेष मेहनत करावी लागली नाही.



या घरातील गृहिणी मंदा ताई यांना सदरचे वृत्त समजताच त्या धावत धावत त्यांनी घर गाठले मोठ मोठ्याने रडू लागल्या सर्वांनी त्यांना दिलासा दिला. मंदा ताई यांनी घरात लोखंडी पेटीत १५ हजार रुपये ठेवले होते. या पेटीमधील कागद पत्रे जळाली परंतु चवन प्रासची प्लास्टिक डबी जळून पार चपटी झाली होती. सदर महिलेने या डबी मध्ये पैसे असल्याचे सांगताच शिक्षक सागर राऊत व ग्रामस्थ काशिनाथ गिरणेकर अन्य लोकांनी ही डबी कापून काढली व सुखरूप ते पॉकेट काढले १५ हजार रुपये जसे होते तसे प्राप्त झाल्याने महिलेस मोठा धीर मिळाला. आग लागताच तातडीने लोकांची मदत मिळाल्याने आग आटोक्यात येऊन होणारे जास्तीचे नुकसान टळले आहे. या आगीमध्ये कपडे, भांडी व महत्वाची कागदपत्र व लाकडी कपाटे जळून खाक झाली आहेत.

# माणगाव येथे जीवनदान महाकुंभ २०२६ अंतर्गत भव्य रक्तदान शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी दक्षिणपीठ नाणीजधाम (महाराष्ट्र) यांच्या प्रेरणेने आणि जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या वतीने माणगाव शाखेत 'जीवनदान महाकुंभ २०२६' अंतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

'राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा उज्ज्वल भविष्यात मोलाची' दरवर्षीप्रमाणे यंदाही १५ दिवस चालणाऱ्या या उपक्रमातून रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

माणगाव शाखेच्या वतीने दि.१० जानेवारी रोजी उपजिल्हा रुग्णालय,माणगाव येथे हे रक्तदान शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

या शिबिरास श्री संप्रदायाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष, संप्रदायाचे सर्व पदाधिकारी तसेच ओम रक्तपेढी,पुणे यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. या शिबिरात माणगाव येथील जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संप्रदायातील सेवकवर्गासह अनेक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले.

रक्तदान हेच श्रेष्ठदान असून प्रत्येकाने स्वतः रक्तदान करावे व इतरांनाही त्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या रक्तदान शिबिरामुळे अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेले हे शिबीर अत्यंत यशस्वीपणे पार पडले.

# राजमाता जिजाऊंचा जन्मोत्सव पाचाडमध्ये साजरा

## 'माँसाहेब जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा उज्ज्वल भविष्यात मोलाची'

**महाड : प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ माँ साहेबांचा ४२७ वा जन्मोत्सव पाचाड येथे साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले यांनी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर राजमाता जिजाऊ माँ साहेबांची आणि छ. शिवाजी महाराज यांची प्रेरणा घेऊनच कामाला सुरुवात केली पाहिजे असे सांगितले.

पाचाड येथे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची ४२७ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जिजामातेच्या समाधी स्थळी पूजन करून जिजामातेच्या कार्याचा जयघोष करण्यात आला. याठिकाणी नवयुग



विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लेझिम नृत्य केले तर ऋचिता घागरे या विद्यार्थिनीने राजमाता जिजाऊंच्या जीवनावरील एकपात्री प्रयोग सादर केला. या कार्यक्रमाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बडे साहेब, तहसीलदार महेश शितोळे, महाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंखे, सरपंच सीमा बेंदुगडे, हे देखील उपस्थित होते.

आपल्या भाषणामध्ये भरत गोगावले यांनी ज्या मातेच्या त्यागामुळे आपण हे जीवन जगत आहोत त्या मातेचे स्मरण कायम ठेवले पाहिजे असे प्रतिपादन केले तर किल्ले रायगडावर आणि परिसरामध्ये करोडो रुपये खर्च करून अद्याप सोयी सुविधांचा अभाव आहे हे मान्य करत लवकरच शिवसृष्टी आणि जिजामाताईच्या वाड्याच्या पुनर्विकासासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले. रघुवीर देशमुख यांनी गडावरील होत असलेल्या कामांबाबत परखड मत व्यक्त केले.



**मुरूड : श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी मुख्याध्यापक अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करण्यात आली. सोबत उपस्थित शिक्षकवृंदही दिसत आहे.**

# बागेतील झाडांना क्यूआरकोड देणारी कळमशेत पहिली शाळा

**तळा :** कळमशेत ही तळा तालुक्यतील शाळा चौथी पर्यंत असून विविध उपक्रम राबविणारी शाळा म्हणून पुढे येत आहे.गुणवत्तापूर्ण शाळा म्हटलं तर वावगं ठरणार नाही.शाळेच्या बागेत असणाऱ्या झाडांना क्यूआरकोड दिले असून त्या झाडाची पुर्ण माहिती स्कॅन केल्यानंतर समोर येते.दक्षिण कोकणात अनेक शाळांचा पट हा कमी होत असताना तळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कळमशेत शाळेचा पट



हा २०२३ ला ५ होता तो आता वाढून १६ झाला आहे.पुढे शाळेचा पट अधिक वाढविण्यासाठी येथील शिक्षकांनी निर्धार केला असल्याचे पहावयास मिळाले आहे.सदर शाळेला २०१९ मधे आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झाला आहे.तसेच माझी मुख्यमंत्री शाळा पुरस्कार २०२३-२०२४ द्वितीय क्रमांक व २०२४-२०२५ प्रथम क्रमांक व २०२५-२०२६ परसबाग तृतीय क्रमांक प्राप्त असे पुरस्कार प्राप्त शाळा गुणवत्तेतही तेवढीच पुढे येताना दिसत आहे.स्पर्धा परीक्षा मंथन मधे सर्व विद्यार्थी यशस्वी होत आहेत.

# श्रीवर्धन नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष पदावर अनंत गुरव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण कै. डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात आज श्रीवर्धन नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत आवाजी मतदानाने उपनगराध्यक्ष म्हणून अनंत गुरव यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा अध्यक्ष अतुल चोगले केली.

उपनगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून अनंत गुरव तर शिवसेना (शिंदे गट) कडून सलोनी मोहित यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. नियमाप्रमाणे अर्ज मागे घेण्यासाठी अध्यक्षांनी १५ मिनिटांचा अवधी दिला. कोणताही अर्ज मागे न घेतल्याने हात वर करून आवाजी मतदान घेण्यात आले. या मतदानात अनंत गुरव यांना स्वतःचे मत धरून एकूण १७ मते मिळाली, तर सलोनी मोहित



यांना ३ मते मिळाली. निकाल जाहीर करताना अध्यक्ष अतुल चोगले यांनी उपनगराध्यक्ष म्हणून अनंत गुरव यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली. याच सभेत स्वीकृत सदस्य म्हणून रुची बोरकर व आराई रहमत अहमद शुकूर यांचीही निवड जाहीर करण्यात आली.


## पेट्रोल/डिझेल पंपावर कामगार पाहिजेत

पनवेल रेल्वे स्टेशन येथे रेल्वे इंजिन मध्ये डिझेल भरण्यासाठी ५ कामगार तातडीने भरती करण्याचे आहेत.

**उमेदवारची पात्रता खालीलप्रमाणे असावी**

१) उमेदवार पुरुष असावा
२) वय २० ते ३० वर्षे
३) १२ वी उत्तीर्ण
४) सुंदर आणि स्मार्ट
५) पनवेल व परिसरात राहणारा असावा
६) स्वत:च्या वाहतुकीसाठी वैयक्तिक दुचाकी असावी
७) फ्रेशर देखील अर्ज करू शकता
८) तांत्रिक शिक्षणाचा अतिरिक्त फायदा होईल

महाराष्ट्र किमान वेतन कायद्यानुसार वेतन असेल
MMWA नुसार Pf, Esic बोनस, ३ शिफ्टमध्ये ८ तास काम करणे.

**खालील कागदपत्रे आवश्यक**

१)बायोडेटा
२)उत्तीर्ण प्रमाणपत्र
३)आधार कार्ड
४)पॅन कार्ड
५)मागील रोजगाराद्वारे वाटप केले असल्यास पीएफ क्रमांक
६)पूर्वीच्या नियोक्त्याने वाटप केले असल्यास ईएसआयसी क्रमांक
७) कायमस्वरूपी संपर्क क्रमांक
८)अलिकडे काढलेला फोटो

**संपर्क क्र. ९९६०६८६९९९**



## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com
pmc.townplanning@gmail.com
दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
वेबसाईट - panvelcorporation.com

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | चिफ ट्रस्टी, पीर करमअलीशा दर्गा ट्रस्ट, ऑफिस : ५०७, पीर कलमअलीशा दर्गाह जवळ, पनवेल, जि. रायगड | ०४ भेंड झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पीर करमअलीशा दर्गा ट्रस्ट, ऑफिस : ५०७, पीर कलमअलीशा दर्गाह जवळ, पनवेल, जि. रायगड या दर्गा ट्रस्टच्या आवारातील ०४ भेंड झाडे धोकादायक स्थितीत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अर्धानियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
(स्वरुप खारगे)
उपायुक्त
(वृक्ष प्राधिकरण विभाग)
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२६/प्र.क्र. ०२/०६/२०२६
दिनांक :- १२/०१/२०२६

# ‘लाडक्या बहिणी’ महायुतीच्या पाठीशी

## प्रभाग १४मधील मोठ्या खांद्यातून मोठे मताधिक्य मिळेल -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून प्रभाग १४ मध्ये झालेली विकासकामे आणि ’लाडकी बहीण’ योजनेचा मिळालेला लाभ पाहता, यंदा मोठ्या खांद्यातून महायुतीला मोठे मताधिक्य मिळेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. प्रभाग १४ मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित पदयात्रेत ते बोलत होते.

मोठा खांदा, धाकटा खांदा गाव आणि परिसरातील नागरी सुविधांची कामे महापालिकेच्या माध्यमातून पूर्ण झाली आहेत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले. कोविड काळातील केंद्राची ’जनधन’ आणि ’मोफत शिधा’ योजना तसेच ’लाडकी बहीण योजना’ यामुळे नागरिक महायुतीवर खुश आहेत.

लाडकी बहीण योजना बंद पडेल अशी अफवा विरोधकांनी पसरवली, मात्र ती आजही सुरू आहे. काँग्रेसला जनहित बघवत नाही, त्यामुळे महिला मतपेटीतून विरोधकांना चोख प्रत्युत्तर देतील. प्रत्येक घरात कमळ निशाणी पोहोचली असून मतदारांचा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. प्रभाग १४ मधील महायुतीचे उमेदवार इक्बालभाई काझी, सारिका भगत, रेणुका नेतकर आणि सतीश पाटील यांच्या प्रचारासाठी ही रॅली काढण्यात आली होती.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयातील इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागात तिसरीत शिकणारी नव्या सचिन मांडोळे हिला नागपूर येथील २३व्या अखिल भारतीय प्रतिभा सन्मान महासंमेलनात रेडियंट टॅलेंट बुकच्या वतीने आयोजित समारंभात मान्यवरांच्या हस्ते नारी शक्ती पुरस्कार, नृत्य शीरोमणी पुरस्कार २०२५, त्याचबरोबर गौरव पत्र देऊन राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले. या बद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नव्या मांडोळे हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होत्या.**

## भाजप महायुतीच्या उमेदवारांनी प्रचारात घेतली मोठी आघाडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप आणि महायुतीच्या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. भाजप महायुती सरकारच्या माध्यमातून शहरात झालेल्या विकासकामांच्या जोरावर उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

याच पार्श्वभूमीवर रविवारी प्रभाग क्रमांक ७ मधील महायुतीचे अधिकृत उमेदवार अमर अरुण पाटील, मनाली अमर ठाकूर, प्रमिला रविनाथ पाटील आणि राजेंद्रकुमार दीपचंद शर्मा यांची भव्य प्रचार रॅली काढण्यात आली, ज्यामध्ये जनसागराचा महापूर लोटला होता. या प्रचार रॅलीचे मुख्य आकर्षण ठरले ते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती. रॅलीमध्ये सहभागी होत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मतदारांशी संवाद साधला आणि महायुतीच्या चारही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. या भव्य रॅलीमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील यांच्यासह महायुतीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीदरम्यान स्थानिक रहिवाशांनी उमेदवारांचे जागोजागी स्वागत केले, ज्यामुळे प्रभाग ७ मध्ये महायुतीचे पारडे जड असल्याचे दिसून येत असून मतदारांच्या मिळणाऱ्या प्रतिसादामुळे उमेदवारांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे.



## भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा -वर्षा भोसले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मैलाचा दगड ठरली आहे. नारी शक्तीचा सन्मान करणे हे भाजप सरकारचे मुख्य ध्येय असून, पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभाग क्रमांक २ मधील भाजप महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा वर्षा भोसले यांनी देवीचापाडा येथे केले.




आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रभाग क्रमांक मधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीचे अधिकृत उमेदवार काजल महेश पाटील, अरुणा किरण दाभणे, दिनेश रवींद्र खानावकर आणि कृष्णा सीताराम पाटील यांच्या प्रचारार्थ देवीचापाडा येथे मलाडकी बहीण मेळाव्याचेफ भव्य आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उदघाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. मेळाव्याला संबोधित करताना वर्षा भोसले यावेळी म्हणाल्या की, जेव्हा प्रभागातील चारही नगरसेवक महायुतीचे असतील, तेव्हाच परिसराचा विकास अधिक वेगाने होईल. हे चारही उमेदवार कमळाच्या रूपाने तुमचे शिलेदार म्हणून महापालिकेत जातील आणि तुमच्या अपेक्षा १०० टक्के पूर्ण करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आता ही जबाबदारी लाडक्या बहिणींची असून त्यांनी विकासाच्या पाठीशी उभे राहावे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या मेळाव्याच्या माध्यमातून महायुतीने प्रभागातील महिलांशी थेट संवाद साधला आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहचवली. या मेळाव्यामध्ये महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमाला लागला. या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, भाजप नेते एकनाथ देशेकर, अनुसूचित जाती मोर्च्याचे जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, प्रकाश खैरे, अशोक शेळके, उत्तर भारतीय मोर्च्याचे जिल्हा अध्यक्ष संतोष शर्मा, सुनील पाटील, युवा मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या मेळाव्याला लाडक्या बहिणींनी दाखवलेलीउपस्थितीत पाहता प्रभाग क्रमांक २ मधील उमेदवार भरघोस मतांनी निवडणूत येथील असे चित्र स्पष्ट होत आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१२) राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि विद्यार्थी कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अलोक कुमार हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना युवकांनी राष्ट्रनिर्मितीत सक्रिय भूमिका घ्यावी, आत्मविश्वास, शिस्त आणि सेवाभाव अंगीकारावा, असे विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना, विस्तार शिक्षण संचालनालय व विद्यार्थी कल्याण समितीचे कार्य महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा उद्देश या कार्यक्रमातून साध्य झाला. या वेळी विद्यार्थ्यांनी मी व्यसनांपासून दूर राहीन, समाजासाठी उपयुक्त कार्य करीन आणि देशाच्या प्रगतीसाठी सदैव प्रयत्नशील राहीन अशी प्रतिज्ञा केली.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. प्रवर शर्मा, प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि विद्यार्थी कल्याण समितीच्या सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## येणाऱ्या काळातील विकासकामांसाठीही महायुती सज्ज -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय यांची महायुती पनवेलच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि उन्नतीसाठी पूर्ण ताकदीनिशी निवडणुकीला सामोरे जात आहे. पनवेलचा विकास महायुतीने मोठ्या प्रमाणात केला असून नागरिकांना उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. येणाऱ्या काळातही अनेक महत्त्वाची विकासकामे नियोजित असून त्यासाठी महायुती सज्ज आहे, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेलमध्ये प्रभाग क्रमांक १४ ते २० मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत व्यक्त केले.



या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट केले की, महायुतीने समाजातील सर्व घटकांना समान न्याय देत विकासाची कामे केली आहेत आणि याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे सांगून १० वेळा निवडणुका झाल्या तरी पनवेलमध्ये भाजप महायुतीच जिंकणार, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच येणाऱ्या तारखेला महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी मतदारांना केले. पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात महायुतीने सध्या मोठी आघाडी घेतली आहे. नवीन पनवेलमधील या सभेत मतदारांशी संवाद साधताना कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह दिसून आला.

या वेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, जितेंद्र म्हात्रे, प्रभाग क्रमांक १६ चे उमेदवार संतोष शेट्टी, समीर ठाकूर, राजश्री वावेकर, कविता किशोर चौतमोल, तसेच प्रभाग क्रमांक १७ मधील उमेदवार अस्मिता जगदीश घरत, शिवानी सुनील घरत यांसह महायुतीचे उमेदवार, पदाधिकारी आणि विविध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुंडे विद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत तरुणाचे स्फूर्तीस्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती व राजमाता जिजाबाई भोसले यांची जयंती विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

प्रसंगी स्वामी विवेकानंद व जिजाबाई भोसले यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपप्राचार्या एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर, एस.एस.पाटील व उपस्थित शिक्षक वृंदाच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी स्वामी विवेकानंद व जिजाऊ माँ साहेब यांचे जीवन कार्य श्रेयस मंडले, स्वराज पवार, गायत्री पोटे, पायल शिंदे यांनी सांगितले. तसेच जिजाऊंच्या जीवनावर सुहानी प्रजापती हिने आम्ही जिजाऊंच्या लेकी या गीताचे सादरीकरण केले. त्या नंतर विद्यालयाचे उपशिक्षक आर.जी. शेळके यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार सांगितले. धर्म हा भारतीय जीवनाचा मूलाधार आहे. आणि विज्ञान प्रगत युगात होरपळणाऱ्या साऱ्या जगाला भारतातील अध्यात्मविचारामुळे शांती लाभणार आहे. अशी त्यांची श्रद्धा होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री व शहाजीराजे भोसले यांच्या ज्येष्ठ पत्नी राजमाता जिजाबाई भोसले यांचे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्थान अनन्यसाधारण आहे.



## गव्हाण फाटा वाहतूक पोलिसांचे वाहनचालक, नागरिकांना प्रबोधन



**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबईचे वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व गव्हाण फाटा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन बडगुजर यांचे आधिपत्याखाली मुंबई आणि राज्यातील महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या गव्हाणफाटा वाहतूक शाखा सर्कल येथे अवजड ट्रेलर, टँकर आणि कार्गो यांच्यासह हलक्या चारचाकी व रिक्षाचालकांसह नागरिकांना रस्ते सुरक्षा आणि वाहन योग्य रितीने चालविण्याबाबत जीवन रक्षा २०२६ बाबत जनजागृतीचे प्रबोधन करण्यात आले.

या वेळी मागील सन २०२५ अखेरीस वर्षभरात २९ हजार ४८४ वाहनांवर दंडात्मक कारवाई, मार्गिका बदलणे - ३८०, अवैध प्रवाशी वाहतूक - १८, विना हेल्मेट - १६६०, वाहन चालवितांना मोबाईल बोलणे - ३०३, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे - २३९, मद्यपान करून वाहन चालविणे - १०५ अशा वाहनचालकांना सुरक्षेच्या दृष्टिकोनातून दंड आकारला असून, एकूण वर्षभरात अन्य दंडासह २९ हजार ४८४ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. तर २ कोटी ९८ लाख ९५ हजार २०० एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून,३२ लाख २० हजार १५०एवढी दंडाची रक्कम वसुली करण्यात आल्याची माहिती गव्हाणफाटा वाहतूक शाखेचे पोलिस नाईक रूपेश दराडे यांनी दिली.

## गव्हाण विद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या ४२८ व्या तसेच स्वामी विवेकानंद यांच्या १६३ व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

या संयुक्त जयंती समारंभात स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस जासई शाखेतील उपशिक्षिका द्रौपदी वर्तक तसेच विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांनी पूजन करून अभिवादन केले.

इयत्ता आठवी क च्या वर्गाच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे आटोपशीर नियोजन वर्गशिक्षिका वृषाली म्हात्रे यांनी केले. या वेळी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांना बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शिका म्हणून उपस्थित असलेल्या विद्यालयाच्या माजी उपशिक्षिका आणि श्री छत्रपती शिवाजी विद्यालय जासई येथील उपशिक्षिका द्रौपदी वर्तक यांचेसह विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांचेसह चारुशीला ठाकूर, मोनाली बाबर, सुजाता शेलार,उज्वला म्हात्रे, विशांत ठाकूर, संपदा म्हात्रे, हर्षला पाटील, शीतल ठाकूर, दर्शना म्हात्रे, सारिका ठाकूर, शितलकुमार म्हात्रे आणि अन्य रयतसेवक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी प्रतिमा पूजन करून या महात्म्यांना आदरांजली वाहिली.



# गुजरातचा थरारक विजय

## दिल्ली पराभूत; नंदिनी शर्माची हॅट्ट्रिक व्यर्थ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अनुभवी सोफी डेव्हाईनच्या शिस्तबद्ध खेळाच्या बळावर गुजरात जायंट्स संघाने वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सवर अवघ्या चार धावांनी थरारक विजय मिळवला. शेवटच्या षटकात दिल्लीला सहा चेंडूत सात धावांची आवश्यकता होती. लॉरा वॉल्व्हडार्ट आणि जेमिमा रॉड्रिग्ज खेळत होत्या, मात्र या दोघींना बाद करत सोफीने विजयाचा मार्ग सुकर केला.

गुजरात जायंट्स संघाने प्रथम फलंदाजी करताना २०९ धावांचा डोंगर उभारला. बेथ मूनी आणि सोफी डेव्हाईन यांनी ९४ धावांची दमदार भागीदारी साकारली. मूनी १९ धावा करून बाद झाली. सोफीला यानंतर कर्णधार अॅश्ले गार्डनरची साथ मिळाली. सोफीने सात चौकार आणि आठ षटकारांसह ४२ चेंडूत ९५ धावांची धुवांधार खेळी साकारली. गार्डनरने २६ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांसह ४९ धावांची वेगवान खेळी साकारली. या दोघी बाद झाल्यानंतर गुजरातची लय हरपली. दिल्लीकडून नंदनी शर्माने हॅट्ट्रिकसह डावात पाच विकेट्स पटकावण्याची किमया केली.

नंदनीने सोफीला बाद करत गुजरातचा वारू रोखला. शेवटच्या षटकात नंदनीने के.एस गौतमला बाद केले. त्यानंतर के.एस अहुजा, राजेश्वरी गायकवाड आणि रेणुका सिंग यांना बाद करत हॅट्ट्रिक नोंदवली. वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेत अशी कामगिरी करणारी ती केवळ चौथी गोलंदाज आहे. इसी वाँग, ग्रेस हॅरिस, दीप्ती शर्मा यांच्या पंक्तीत नंदिनीने स्थान पटकावले. दिल्ली कॅपिटल्स संघातर्फे हॅट्ट्रिक घेणारी ती पहिलीच गोलंदाज आहे.

दिल्लीला लिझले ली आणि शफाली वर्मा यांनी ४१ धावांची सलामी दिली. शफाली १४ धावांवर बाद झाली. दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वॉल्व्हडार्टने ७७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारत ली हिला चांगली साथ दिली. ली हिने ५४ चेंडूत १२ चौकार आणि तीन षटकारांसह ८६ धावांची अफलातून खेळी साकारली. ती बाद झाल्यानंतर लॉराने सूत्रे स्वीकारली. लॉरा दिल्लीला जिंकून देणार असे चित्र होते. शेवटच्या षटकात दिल्लीला ६ चेंडूत ७ धावा हव्या होत्या. लॉराने पहिल्या चेंडूवर एक धाव घेतली. दुसऱ्या चेंडूवर सोफी डेव्हाईनने दिल्लीची कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जला बाद करत धक्का दिला. जेमिमाने १५ धावा केल्या. मॅरिझान कापला पुढच्या दोन चेंडूत एकच धाव घेऊ शकली. पाचव्या चेंडूवर लॉराचा मोठा फटका मारायचा प्रयत्न वारेहमच्या हातात जाऊन विसावला. शेवटच्या चेंडूवर दिल्लीला पाच धावांची आवश्यकता होती. डेव्हाईनने टिच्चून मारा करत स्नेहला एकही धाव घेऊ दिली नाही. दिल्लीचा संघ २०५ धावाच करू शकला. सोफीने तीन षटकात २१ धावांच्या मोबदल्यात दोन विकेट्स घेतल्या. राजेश्वरी गायकवाडनेही दोन विकेट्स घेत तिला चांगली साथ दिली.

# कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने ५१व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता आपला संघ घोषित केला. परभणीच्या अतुल जाधवकडे या संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे १५ ते १८ जानेवारी या कालवधीत ही स्पर्धा होईल.

बारामती (पुणे) येथे मुंबई उपनगरचे राष्ट्रीय कबड्डी खेळाडू गिरीश पवार याच्या मार्गदर्शनाखाली या संघाचे सराव शिबिर सुरू होते. या संघात परभणी, पुणे शहर आणि ठाणे ग्रामीणचे प्रत्येकी दोन, तर मुंबई शहर, पिंपरी चिंचवड, पुणे ग्रामीण, रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी, पालघर आणि अहिल्यानगरमधील



अतुल जाधवकडे नेतृत्वाची धुरा

प्रत्येकी एका खेळाडूचा समावेश आहे.

हा संघ १३ जानेवारी रोजी दुपारनंतर मुंबईतील महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या कार्यालयात येईल. त्यानंतर १४ जानेवारीला सकाळी ६.५५च्या एलटीटी–विशाखापट्टणम एक्सप्रेसने विजयवाडा येथे स्पर्धेकरिता रवाना होईल, अशी माहिती संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांनी केली.

**संघ :** अतुल जाधव (संघनायक, परभणी), साई चौगुले (मुंबई शहर), शुभम बिटके (पिंपरी चिंचवड), अर्जुन धडस (पुणे ग्रामीण), समीर हिरवे (रायगड), शुभम रेपे (कोल्हापूर), वेदांत कांबळे (रत्नागिरी), तृणाल भुजबळ व कुणाल हर्णेकर (पुणे शहर), जीतसिंग सैनी व रौनक पाटील (ठाणे ग्रामीण), विशाल गोराडे (पालघर), वेदांत उंदरे (अहिल्यानगर), वेदांत जाधव (परभणी), प्रशिक्षक गिरीश पवार, व्यवस्थापक नमोशिवाय पायगण.

# विराटचे शतक हुकले, पण दोन विक्रम मोडले

**बडोदा : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघ ३०१ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. आव्हान मोठे होते, पण चेज मास्टर विराट कोहलीने एक बाजू धरून ठेवत दमदार अर्धशतकी खेळी केली. विराटकडे शतक झळकावण्याची सुवर्णसंधी होती, पण त्याचे शतक अवघ्या सात धावांनी हुकले. यादरम्यान त्याने दोन मोठे विक्रम मोडून काढले.

या सामन्यात भारतीय संघाला विजयासाठी ३०१ धावा करायच्या होत्या. धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या रोहित शर्मा आणि शुबमन गिल या जोडीने वेगवान सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून ३९ धावा जोडल्या. रोहित २६ धावा करून बाद झाल्यानंतर विराट आणि गिलने मिळून डाव सांभाळला. विराट आणि गिलने मिळून ११७ धावांची भागीदारी केली. गिलने चांगली साथ देत ५६ धावांची खेळी केली. त्यानंतर विराट आणि श्रेयस अय्यरने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून महत्त्वपूर्ण भागीदारी केली. त्यानंतर विराटकडे ५४वे शतक झळकावण्याची संधी होती, पण त्याचे शतक हुकले

सचिनच्या नावे ३४,३५७ धावा करण्याची नोंद आहे, तर २८,०१६ धावा करण्यासह श्रीलंकेचा स्टार फलंदाज कुमार संगकारा या यादीत दुसऱ्या स्थानी होता. आता तो विराट हा संगकाराला मागे टाकून या यादीत दुसऱ्या स्थानी पोहचला आहे. विराटने २८ हजार धावा पूर्ण केल्या आहेत.

विराट कोहलीच्या नावे आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद २८ हजार धावा करणारा फलंदाज ठरला आहे. विराटने या रेकॉर्डमध्ये सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. सचिनने हा ६४४ डावात इतक्या धावा केल्या होत्या, तर विराटने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ६२४व्या डावात ही कामगिरी केली.

# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राची पदक अष्टमी

## सागरी जलतरणात उपविजेतेपद

**दीव : वृत्तसंस्था**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने तीन रौप्य, पाच कांस्यपदकांसह आठ पदकांची लयलटू केली आहे. साताऱ्याच्या दीक्षा यादव पदकाचा डबल धमाका केला. दीक्षाच्या एक रौप्य व एक कांस्यपदकामुळे सागरी जलतरणात महाराष्ट्राने उपविजेतेपद पटकावले.

दीवमधील अरबी समुद्रातील सागरी जलतरणाचा महाराष्ट्राच्या मुलींनी पदकाचा करिष्मा घडविला. साताऱ्याच्या दीक्षा यादवने पाच किमी शर्यतीत रौप्य, तर १० किमी शर्यतीत कांस्यपदक पटकावले. सलग दुसऱ्या वर्षी दीक्षाने दोन्ही शर्यतीत पदकाचा पराक्रम केला आहे. या यशामुळे सागरी जलतरणातील महिलांचे उपविजेतपद महाराष्ट्राने संपादन केले. कर्नाटकला विजेतेपदाचा, तर महाराष्ट्राला उपविजेतेपदाचा करंडक पथकप्रमुख नवनाथ फरताडे यांच्या हस्ते देण्यात आला.




घोघला समुद्र किनाऱ्यावर दुसऱ्या खेलो इंडिया बीच स्पर्धेचा थरार रंगला. सागरी जलतरणाच्या जोरावर कर्नाटकाने सर्वसाधारण विजेतेपदाचा मान पटकविला. तामिळनाडूने स्पर्धेत दुसरे, तर मणिपूरने तिसरे स्थान संपादन केले. या तिन्ही संघानी प्रत्येकी तीन सुवर्ण, दोन रौप्यपदके जिंकल्याने सर्वसाधारण विजेतेपदाचा फैसला कांस्यपदकावर घेण्यात आला. तीन सुवर्ण, दोन रौप्य व सहा कांस्यपदकाची लयलूट करीत कर्नाटकाने स्पर्धेत बाजी मारली.

स्पर्धेत महाराष्ट्राचे ७७ जणांचे पथक सहभागी झाले होते. यामध्ये ३१ पुरुष आणि २८ महिला खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट, सागरी जलतरण महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. महाराष्ट्राने तीन रौप्य, पाच कांस्यपदकांसह आठ पदकांची कमाई केली आहे. बीच पेंचक सिलट स्पर्धेत दोन रौप्य व एक कांस्य अशी तीन पदके महाराष्ट्राच्या नावापुढे झळकली. बीच कबड्डी दोन्ही संघांना, तर बीच सॉकरमध्ये पुरुष संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

सर्व पदकविजेत्यांचे क्रीडा आयुक्त शीतल तेली–उगले, सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी, उपसंचालक संजय सबनीस यांनी अभिनंदन केले आहे. मोरे यांनी सांगितले की, खेलो इंडिया बीच स्पर्धा ही खेळाडूंसाठी मोठी पर्वणी ठरली. स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वातही महाराष्ट्राची चमकदार कामगिरी केली आहे.

# न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतून वॉशिंग्टन सुंदर बाहेर

## आयुष बदोनीला मिळाली संधी



**राजकोट : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात मिळवलेल्या विजयानंतर भारतीय क्रिकेट संघातील स्टार ऑलराउंडर वॉशिंग्टन सुंदर दुखापतीमुळे उर्वरित मालिकेतून बाहेर फेकला गेला आहे. त्याच्या जागी दिल्लीचा एका स्फोटक फलंदाज आयुष बदोनीला संघात स्थान देण्यात आले आहे. वडोदरा येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात गोलंदाजी करत असताना वॉशिंग्टन सुंदरच्या बरगड्यांच्या खालच्या भागात अचानक तीव्र वेदना सुरू झाल्या. या त्रासामुळे त्याने केवळ पाच षटके टाकली आणि तो मैदानाबाहेर गेला, मात्र संघाला गरज असताना त्याने दुखापतीकडे दुर्लक्ष करत आठव्या क्रमांकावर फलंदाजीला येण्याचे धाडस दाखवले आणि नाबाद ७ धावा करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.

बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार सुंदरला आता पुढील स्कॅन आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यासाठी पाठवण्यात आले असून तो या मालिकेतील पुढील दोन सामन्यांना मुकणार आहे.

सुंदरच्या जागी दिल्लीचा युवा आणि गुणवान खेळाडू आयुष बदोनी याला भारतीय संघात पाचारण करण्यात आले आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचा लाडका खेळाडू म्हणून बदोनीची ओळख आहे. आयपीएलमध्ये लखनऊ सुपर जायंट्ससाठी खेळताना बदोनीने आपल्या फिनिशिंग टचने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

# रोहित शर्माचा जागतिक विक्रम

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६५० षटकार ठोकणारा एकमेव



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा अनुभवी सलामीवीर आणि 'हिटमॅन' अशी ओळख असणाऱ्या रोहित शर्माने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात फलंदाजी करताना एक अभूतपूर्व इतिहास रचला आहे. आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेल्या रोहितने क्रिकेट विश्वात असा पराक्रम केला आहे, जो आजवर कोणत्याही खेळाडूला जमलेला नाही.

न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात रोहितने २९ चेंडूत २६ धावांची खेळी केली. या छोट्या खेळीत त्याने तीन चौकार आणि दोन शानदार षटकार ठोकले. या दोन षटकारांच्या जोरावर रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (कसोटी, वनडे आणि टी–२० मिळून) आपल्या ६५० षटकारांचा टप्पा पूर्ण केला आहे. जागतिक क्रिकेटच्या इतिहासात ६५० षटकार मारणारा रोहित हा जगातील पहिला आणि एकमेव फलंदाज ठरला आहे.

**गेलचा विक्रम मोडला**

रोहित शर्माने या सामन्यात केवळ ६५० षटकारांचा टप्पाच गाठला नाही, तर त्याने 'युनिव्हर्स बॉस' ख्रिस गेलचा एक मोठा विक्रमही मोडीत काढला. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून सर्वाधिक षटकार मारण्याचा मान आता रोहितकडे गेला आहे. सलामीवीर म्हणून रोहितच्या नावावर आता ३२९ षटकार जमा झाले आहेत, तर ख्रिस गेलने ३२८ षटकार मारले होते.

पान ३ वरुन

# कोणी कितीही बोटे मोडली तरी महायुतीच जिंकणार!

महायुतीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उमेदवारांना बळ दिले आहे. निवडणुका आल्या म्हणून आम्ही जनतेसमोर जात नाही, तर विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही दक्ष असतो. म्हणून जनता आम्हाला भरभरून प्रतिसाद देते. येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वच्या सर्व उमेदवार निवडून येणार आहेत. कामोठेवासीय जनता केलेल्या कामाला दाद दिल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांनी, पनवेल महापालिकेवर झेंडा फडकवण्याठी महायुती सज्ज झाली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासकामांच्या माध्यमातून पनवेलचा चेहरामोहरा बदलला आहे. विकासकामांचा प्रवास अविरतपणे सुरू ठेवण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन केले.

## पनवेल महापालिकेत महायुती भक्कम –मंत्री शिवेंद्रराजे भोसले

मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, महायुतीच्या प्रचारासाठी आम्ही सगळे एकत्र आलो आहोत. पनवेल महापालिकेत आमदार प्रशांत ठाकूर व सहकाऱ्यांच्या माध्यमातून महायुती झाली. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन! ज्या पद्धतीने तुम्ही एकत्र येऊन लढण्याचा निर्णय घेतला तो कौतुकास्पद आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने परिसराच्या विकासासाठी धडपड करणारे नेतृत्व तुमच्याकडे आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा त्यांना वारसा असून सर्वसामान्यांसाठी ते काम करतात. विविध कामे घेऊन आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी सातत्याने माझ्याकडे येत असतात, असेही मंत्री भोसले यांनी सांगितले.

या वेळी मंत्री आदिती तटकरे आपल्या भाषणात म्हणाल्या की, सर्वप्रथम पनवेल महापालिका क्षेत्रातील नेतेमंडळींचे आभार व अभिनंदन, कारण येथे महायुती पहायला मिळते. २०१६मध्ये स्थापन झालेल्या या महापालिकेचे महत्त्व आगळेवेगळे आहे. इतर महापालिकांच्या तुलनेत विकास काय असतो हे दाखवणारी ही महापालिका आहे. येत्या काळातसुद्धा स्थानिकांचे प्रश्न सोडविणे, अधिकाधिक विकास करणे; त्याचबरोबर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळातून रोजगार निर्माण करणारी ही मनपा असणार आहे. कोविड काळात सर्वात लवकर व मोठे सेंटर सिडकोच्या माध्यमातून पनवेल महापालिकेत तयार झाले. अद्ययावत सुविधा या निमित्ताने देऊ शकलो याचे समाधान आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेव्हा येथील विमानतळाचे उद्घाटन केले तेव्हा त्यांनी लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांना सर्वप्रथम अभिवादन केले. विरोधकांकडे विरोध आणि टीका करणे या पलिकडे काही नाही, परंतु तीन लाडके भाऊ देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त विकासकामे केली जाणार आहेत. आपल्या उमेदवारांची ओळख नगरसेवक–नगरसेविका नाही, तर लोकसेवक–लोकसेविका म्हणून असेल, असे मंत्री तटकरे यांनी म्हटले.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी मुंबई–पुणे महामार्गावर साकारण्यात येत असलेल्या मिसिंग लिंकला वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्यावे यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिल्याचे सांगून कळंबोली येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या भवनसाठी पाच कोटी रुपयांचा निधी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपलब्ध करून दिला, मी नगरविकास खात्यामधून एक कोटी मिळवून दिले. विरोधकांकडे व्हिजन नाही. त्यांनी ठोस काम केले नाही. त्यामुळे त्यांच्याकडे पहायचे नाही. महायुतीला विजयी करायचे, असे आवाहन केले.

प्रशांतदादा येथील आमचे लोक तुमच्यावर खूप प्रेम करतात. आम्ही ठाकूर चित्रपटात पाहिले होते. प्रत्यक्षात पाहिले नव्हते, पण लोकनेते रामशेठ ठाकूर व तुम्हाला पाहिले. तुम्ही गोरगरीबांसाठी काम करता, सर्वसामान्यांचे दुःख जाणता व त्यांना मदत करता, असे म्हणत त्यांच्या कार्याचे आमदार पडळकर यांनी कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, विकासाच्या प्रवाहात कळंबोली वेगाने चालत आहे. येत्या १५ तारखेला तुमच्या सर्वांचा कौल महायुतीला असणार आहे. त्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. खोटानाटा प्रचार करायचा, आरोप करायचे असे उद्योग ते करीत आहेत. म्हणे ६५ टक्के टॅक्स माफ करणार. एवढे दिवस त्यांना जनतेला केवळ वेगवेगळ्या भ्रमात ठेवले, पण जनता सुज्ञ असून वेळोवेळी तुमचे बहाणे त्यांनी पाहिलेले आहेत. तुमच्या भूलथापांना जनता फसणार नाही.

टॅक्समाफी कुणाला नकोय, पण टॅक्समाफी करतोय सांगायचे आणि जनतेला फसवायचे, सत्तेच्या विरोधात उभे करायचे, सुखसोयींपासून वंचित ठेवायचे, व्याज दंडाचा त्यांच्या माथ्यावर मारायचे काम विरोधकांनी केले. याउलट आम्ही ३५ टक्के सवलत मिळवून दिली. परिसराच्या विकासासाठी भाजप महायुतीने काम केले, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठामपणे म्हटले.

### शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल



दरम्यान, या सभेवेळी कोयनावेळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विनेश कदम आणि जयराम कदम यांच्या पुढाकाराने शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

महेश पुरुषोत्तम कदम, प्रसाद प्रताप कदम, सागर राजेंद्र कदम, ऋषिकेश नंदकुमार कदम, यश दिलीप मोरे, संतोष जयराम कदम, निखील बळीराम कदम आणि स्वप्नील राजेंद्र कदम यांनी या वेळी विकासाचे 'कमळ' हाती घेतले. या सर्वांचे उपस्थित मान्यवरांनी भाजपमध्ये स्वागत केले. भूपेश चव्हाण, सुशांत कदम, शुबम कदम उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com